



# विकासपर्वाचे दिपस्तंभ
# डॉ.शंकरराव चव्हाण

संपादक – प्रा.डॉ. [illegible] पाटील


Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.) Estd. 1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

| | | | |
|---|---|---|---|
| ११. | प्रा.डॉ.जि.एस. पिसे | डॉ.शंकरराव चव्हाण यांचे जलव्यवस्थापन :दिशा आणि गती | ९१ |
| १२. | प्रा.डॉ.एस.डी. सावंत | महाराष्ट्राच्या जलसंस्कृतीचे जनक : शंकरराव चव्हाण | ९६ |
| १३. | प्रा.डॉ.संतोष कोटुरवार | तत्वनिष्ठ व कृतिशील व्यक्तीमत्व : डॉ.शंकरराव चव्हाण | १०३ |
| १४. | प्रा.डॉ.शारदा बंडे | महाराष्ट्राच्या जडणघडणीत ना.श्री शंकरराव चव्हाण यांचे योगदान | १११ |
| १५. | प्रा डॉ वसंत कदम | शंकररावजी चव्हाण एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व... | ११६ |
| १६. | प्रा. धनंजय रा. जवळेकर | जलसंवर्धनाचे दिपस्तंभ डॉ. शंकरराव चव्हाण | १२० |
| १७. | प्रा. डॉ. केशव लहाने | महाराष्ट्राच्या जलसंस्कृतीचे प्रणेते : डॉ. शंकरराव चव्हाण | १२७ |
| १८. | प्रा.बालासाहेब कानडे | डॉ. शंकरराव चव्हाण– अभ्यासू, शिस्तप्रिय व कुशल प्रशासक | १३१ |
| १९. | डॉ सोमनाथ गुंजकर | जनतेच्या विकासासाठी कार्य करणारा भूमिपुत्र | १३६ |
| २०. | भिकाणे शोभा | आधुनिक भगीरथः डॉ.शंकरराव चव्हाण | १४५ |
| २१. | विकास कांबळे | डॉ.शंकरराव चव्हाण यांचे हैदराबाद मुक्ती संग्रामामधील योगदान | |

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511

| | | | |
|---|---|---|---|
| २२. | सूर्यवाड जळबा | अष्टपैलू व्यक्तीमत्व : डॉ. शंकर राव चव्हाण | १६२ |
| २३. | प्रा. डॉ विभुते | कै.डॉ.शंकररावजी चव्हाण यांचा जीवनविषयक दृष्टिकोन. | १६७ |
| २४. | डॉ दत्ता मेहत्रे | कै. डॉ.शंकररावजी चव्हाण यांची जीवनविषयक दृष्टिकोन | १७१ |
| २५. | माने शाहूराज | जल संस्कृतीचे महानायक –शंकरराव चव्हाण | १७९ |
| २६. | ओमकुमार कवाळे | शंकरराव चव्हाण: बहुआयामी व्यक्तीमत्व | १८४ |
| २७. | डॉ. रामेश्वर सपकाळ | अष्टपैलू राजनीतीज्ञ: मा. श्री. शंकररावजी चव्हाण | १८९ |
| २८. | प्रा.डॉ.मगर डी.के. | धवल क्रांतीचे प्रणेते डॉ. शंकरराव चव्हाण | १९५ |
| २९. | डॉ.भालेराव जी. पी | जलसंस्कृतीचे जनक कै. शंकरराव चव्हाण | २०० |
| ३०. | शिवभक्त प्रकाश | नवराष्ट्र उभारणीतील स्व.शंकरराव चव्हाण यांचे योगदान | २०४ |
| ३१. | प्रा.डॉ.कोंडकर आर.एस. | डॉ.शंकरराव चव्हाण : जीवन व कार्य | २०८ |
| ३२. | डॉ.गिरे संजय | मराठवाड्याचे भाग्यविधाते डॉ.शंकरराव चव्हाण | २२७ |
| ३३. | प्रा. डॉ.मोहोकार हरिहर शिवदास | मराठवाड्याच्या सिंचन विकासात डॉ.शंकरराव चव्हाण यांचे योगदान | २३३ |

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

नांदेड, २००६.

२. कुलकर्णी भुजंगराव, मराठवाड्याचा विकास अभ्यास व चिंतन, पद्य प्रकाशन, १९९८.

३. गाडगीळ स.रा., डॉ.गर्ग स.मा., मराठवाड्याचा विकास दिशा आणि गती, प्रकाशन, १९९५.

४. गाडे सोपान, मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण, अविष्कार प्रकाशन, पुणे, 2002.

५. चव्हाण कुसुमताई, कुसुमांजली, १९९४.

६. भोंगळे सुधीर, राजकारण पाण्याचे, राजहंस प्रकाशन, पुणे, 1998.

७. वाळिंबे वि.स., मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण, प्रकाशन, १९७४.

८. सुरेश सावंत, महाराष्ट्राचे शिल्पकार–शंकरराव चव्हाण, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००६.

मासिक :

महाराष्ट्र सिंचन विकास, त्रैमासिक, एप्रिल, मे, जून २००९.

अहवाल :

सुर्यवंशी उत्तम, दैनिक सत्यप्रभा, ५ वा वर्धापन दिन विशेषांक, नांदेड.

विशेषांक :

गव्हाणे अजय, दैनिक सत्यप्रभा, ७ वा वर्धापन दिन विशेषांक, जुलै २००९.

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

# जनतेच्या विकासासाठी कार्य करणारा भूमिपुत्र

डॉ सोमनाथ लक्ष्मण गुंजकर
श्री गुरु बुध्दिस्वामी महाविद्यालय
पूर्णा ( जं) जि. परभणी

## प्रस्तावना

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये मराठवाड्यातील ज्या व्यक्तीची वेगवेगळ्या क्षेत्रात योगदान दिले, अशा नावांची यादी खुप मोठी पण, राजकीय क्षेत्र म्हटले की,ना.शंकरराव भाऊराव चव्हाण यांचे नाव येते शंकरराव जन्मभूमी पैठण तर कर्मभूमी नांदेड. दक्षिण गंगा म्हणुन ओळखली जाणारी गोदावरीचे पवित्र्य पाहून दक्षिणगंगेचा दास होऊन हजारो एकर जमिनी पाण्याखाली आणून महाराष्ट्राचा बराचशा भुभाग सुजलाम सुफलाम करण्याचे भाग्य गोदाकाटच्या राजयोग्याला मिळाले हे त्यांच्या कार्याचे फळ आहे.ना.शंकरराव चव्हाण यांच्या कार्यामुळे त्यां–च्या व्यक्तिमत्वाच्या एक–ऐका उज्वल पैलूचे दर्शन झाले. ना.शंकरराव चव्हाण हे केवळ दर्शनाचा विषय नसून तो सखोल अभ्यासाचा व संशोधनाचा विषय आहे (१)

### १) ग्रामीण भागाबद्दल आपुलकी

जन्म शेतकरी कुटुंबात पैठण येथे झाला तेथेच प्राथमिक शिक्षण घेऊन पुढे उस्मानिया (हैदराबाद) विद्यापीठातून ते बी.ए., एलएल.बी. झाले. १९४५ मध्ये त्यांनी वकिलीची सनद मिळवली. पण रामानंदतीर्थ यांच्या सल्ल्याने ते हैदराबाद मुक्तिसंग्रामात सहभागी झाले. पुसद तालुक्यातील उमरखेड हे गाव त्यांच्या कार्याचे केंद्र होते. १३ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान भारतात सामील झाले आणि शंकररावांच्या कर्तृत्वाचे एक पर्व पूर्ण झाले. १९४८–४९ मध्ये नांदेड जिल्हा

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

काँग्रेसचे ते सरचिटणीस झाले. १९५२ च्या निवडणुकीत पराभव होऊनही ते खचले नाहीत. त्यांनी नांदेड नगरपालिकेत, सहकारी क्षेत्रात व कामगारवर्गात कार्य केले. नांदेडचे नगराध्यक्ष (१९५६), नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष आणि हैदराबाद राज्य सहकारी बँकेचे संचालक इ. विविध पदे त्यांनी भूषविली. १९५६ मध्ये मराठवाडा महाराष्ट्रात समाविष्ट झाला, त्यावेळी शंकररावांना मंत्रिमंडळात उपमंत्रिपद मिळाले. पुढे १९६० मध्ये पाटबंधारे व वीज खात्याचे ते मंत्री झाले आणि नंतर १९७२ पासून फेब्रुवारी १९७५ पर्यंत ते कृषिमंत्री होते. २१ फेब्रुवारी १९७५ रोजी ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले.पाटबंधारे मंत्री म्हणून त्यांनी भरीव कामगिरी केली. कृष्णा–गोदावरी पाणी तंट्यात त्यांची भूमिका वाखाणण्यासारखी आहे. गोदावरी, पूर्णा आणि मांजरा या धरणांद्वारा त्यांनी मराठवाड्याचा विकास घडवून आणला. जायकवाडी प्रकल्प हा शंकररावजींच्याच प्रयत्नाचे मोठे फळ आहे. भ्रष्टाचाराचे निर्मूलन, अधिक कार्यक्षम प्रशासन, १० लाख टनांहून अधिक धान्य उत्पादन वगैरे त्यांची धोरणे आहेत.कोणताही राजकीय प्रश्न ते समझोत्याने सोडवितात. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा मे १९७५ मधील संप ज्या पद्धतीने त्यांनी हाताळला, त्यावरून हे सिद्ध होते. ते रामानंदतीर्थ व गोविंद श्रॉफ यांना राजकीय गुरू मानतात. मितभाषी व कर्तव्यदक्ष प्रशासक आणि अभ्यासू वृत्ती हे गुणविशेष त्यांच्यामध्ये प्रकर्षाने दिसतात. शंकररावांच्या सामाजिक सेवाव्रताशी समरस झालेल्या त्यांच्या पत्नी सौ. कुसुमताई घरगुती शेतीवाडीतही जातीने लक्ष घालतात. २)

## २) अनेक पदावर कार्य

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री, डॉ. शंकरराव चव्हाण यांनी राज्याच्या विधान परिषद आणि विधानसभा तसेच संसदेच्या राज्यसभा, लोकसभा अशा चारही स– भागृहांचे सन्माननीय सदस्यत्व भूषविले आहे. महाराष्ट्र राज्याच्या जडणघडणीमध्ये सिंहाचा वाटा असलेले माजी मुख्यमंत्री स्वर्गीय शंकरराव चव्हाण यांची कारकीर्द अविस्मरणीय आणि स्पृहणीय अशीच आहे. हैद्राबाद मुक्तिसंग्रामाचे थोर स्वातंत्र्य सेनानी स्वामी रामानंद तीर्थ यांनी 'सत्ता ही बहुजन हितार्थ राबवावी' हा दिलेला

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)



कानमंत्र आदरणीय चव्हाण साहेबांनी अखेरपर्यंत व्रतासारखा सांभाळला. अपार दूरदृष्टी, शून्यातून विश्व निर्माण करण्याचे समर्थ कर्तृत्व, लोकाभिमुख कामात पूर्ण झोकून देऊन काम, उत्तम प्रशासन, निष्कलंक चारित्र्य, वैचारिक समन्वय साधण्याची वृत्ती, अजोड कर्तव्यनिष्ठा ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वेधक वैशिष्टये होत. 'पाणी अडवा पाणी जिरवा' ही त्यांची घोषणा जलक्षेत्रासाठी बोधवाक्य सिद्ध झाली. 'जलक्रांतीचे जनक' असा त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात येतो. अनेक प्रकल्पांच्या पूर्ततेसाठी त्यांनी घेतलेल्या अथक व अभ्यासपूर्ण परिश्रमांमुळे त्यांना 'आधुनिक भगीरथ' म्हणून देखील आदराने गौरविण्यात येते. त्यांचे व्यक्तिमत्व, नेतृत्व आणि कर्तृत्व समाजाला सदैव प्रेरणा देत राहील, हे निश्चित. त्यांच्या कार्यकालावधीत महाराष्ट्र राज्याने जलक्षेत्रात भरीव कामगिरी केली, हे सर्वश्रूत आहे.अशा प्रेरक, थोर, सृजनशील व्यक्तिमत्वाच्या विकासाचे प्रतिबिंब महाराष्ट्राच्या कानकोपऱ्यात पाहाव्यास मिळते (३) मराठवाड्याला निजामाच्या जुलमी राजवटीतून मुक्त करण्यासाठी थोर स्वातंत्र्यसेनानी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या सूचनेनुसार शंकरराव चव्हाण उमरखेड कॅम्पमध्ये दाखल झाले होते.

## ३) लोककल्याणकारी नेतृत्व

पैठणचा जायकवाडी प्रकल्प होऊ नये म्हणून विरोधक एकवटले होते. परंतु, कणखर बाण्याच्या ना.शंकरराव चव्हाण यांनी विरोधकांना पटवून, प्रसंगी कडवा विरोध पत्करून नाथसागर साकारला. जायकवाडी नसते तर औरंगाबादची तहान कशी भागली असती, याची कल्पना करू शकत नाही. केवळ मराठवाडा, विदर्भ नव्हे, तर संपूर्ण राज्याच्या सिंचन क्षमतेचा बारकाईने अभ्यास अन् व्यासंग असणाऱ्या या उत्तुंग नेतृत्वाने महाराष्ट्र आणि दिल्ली गाजविली. शंकररावजींच्या लोककल्याणकारी जीवित कार्याचा पट डोळ्यांसमोर उभा राहतो.मराठवाड्याला निजामाच्या जुलमी राजवटीतून मुक्त करण्यासाठी थोर स्वातंत्र्यसेनानी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या सूचनेनुसार शंकरराव चव्हाण उमरखेड कॅम्पमध्ये दाखल झाले होते. हैदराबादेतील वकिली सोडून ते स्वातंत्र्य संग्रामात उतरले. स्वातंत्र्य चळवळीत अग्रणी राहिलेल्या शंकररावांनी पुढील संपूर्ण आयुष्य राजकारणात

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

अर्थात लोककल्याणासाठी झोकून दिले. न जिमाचे राज्य संपुष्टात आल्यानंतर हैदराबाद स्टेटमध्ये मराठी, तेलगू आणि कानडी भाषिक होते. त्यावेळी हैदराबादच्या विभाजनाला दिल्लीचा विरोध होता. याच काळात काँग्रेसमध्ये शंकरराव चव्हाण यांचे तरुण नेतृत्व उदयाला आले.हैदराबाद राज्याच्या विभाजनासाठी पंडित जवाहरला –ल नेहरू यांचा होकार मिळविण्यात शंकररावजींची भूमिका मोलाची होती. ते नांदेडचे पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष होते. त्या काळात पालिकेचा कारभार हैदराबाद कायद्यानुसार चालत असे. सुरुवातीपासूनच पाणी, सिंचन विषयात त्यांचा अभ्यास होता. हैदराबादचे मुख्यमंत्री बी. रामकृष्णराव हे तेलंगणा विभागाला झुकते माप देतात आणि आपल्या भागातील पाटबंधारेचे काम घेऊन गेले, तर धरणाने तुमची जमीन वाया जाईल असे म्हणतात, हे शंकररावजींना पटत नव्हते. त्यांनी थेट पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची भेट घेऊन हैदराबाद राज्याच्या मुख्यमंत्र्यांचीच तक्रार केली होती. एक तरुण नेता वैयक्तिक प्रश्न न मांडता सार्वजनिक समस्या घेऊन मुख्यमंत्र्यांपर्यंत जातो, त्यांनी ऐकले नाही तर थेट पंतप्रधानांकडे तक्रार करतो, याचे कौतुक खुद्द पंडित नेहरूंना वाटले असावे. १९५२ ते ५६ या काळात नांदेडचे नगराध्यक्षपद. त्यानंतर १९५६ मध्ये द्वैभाषिक मंत्रिमंडळात उपमंत्री. महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर राज्याचे दोनवेळा मुख्यमंत्री, देशाचे अर्थमंत्री, गृह व संरक्षणमंत्रीपदही भूषविले.घोडा चिखलात फसला...लोकनिष्ठा कशी असावी, याचे उदाहरण स्वतः शंकररावजींनी एकदा दिले. त्यांच्या विधानसभा निवडणुकीचा खर्च अडीचशे रुपये आला होता. पोस्टर, बॅनरचा खर्च कार्यकर्ते स्वतः करीत होते. जिथे संकट आले, तिथे धावून जाण्याची वृत्ती होती. मतदारसंघात एका पूरग्रस्त गावाला भेटीसाठी निघाल्यावर वाटेत चिखलात घोडा फसला. त्याला कसेबसे बाहेर काढून शंकररावजी महत्प्रयासाने गावात पोहोचलेच. संकटकाळी कोणी तरी धावून येतो, ही भावना त्यांच्याविषयी जनतेत आपुलकी निर्माण करणारी ठरली. ना. शंकररावसाहेबांची सामान्य माणसां –शी जुळलेली ही नाळ नव्या पिढीला प्रेरणादायी ठरणारे आहे.

४)आधुनिक भगीरथ

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)



ना. शंकरराव चव्हाण यांनी अनेक प्रकल्पांची उभारणी केली ...शंकरराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीमुळे राज्यातील सिंचन प्रकल्पांना गती मिळाली. जायकवाडी, विष्णुपुरी, इसापूर, मनार, सिद्धेश्वर, येलदरी, दुधना, अप्पर पैनगंगा, मांजरा, पूर्णा अशा किती तरी प्रकल्पांच्या उभारणीत त्यांचे मोलाचे योगदान राहिले. किंबहुना हे प्रकल्प पूर्णत्वाला जाण्यासाठी त्यांनी जे भगीरथ प्रयत्न केले, त्यामुळे त्यांचा 'आधुनिक भगीरथ' असा गौरवही केला जातो. केवळ मराठवाडा, विदर्भ नव्हे, तर कोकणासारख्या डोंगराळ भागातही पाटबंधारे योजना कशा राबविता येतील, याचा शास्त्रशुद्ध अभ्यास शंकररावजींनीकेला होता. नर्मदेच्या पाण्यावर महाराष्ट्राचा हक्क असल्याचे सर्वांत पहिल्यांदा शंकरराव चव्हाण यांनीच पटवून दिले होते.कठोर प्रशासक आणि बांधीलकी...राजकारण आणि राजकारणी लोकानुनय करण्याच्या दिशेने जातात. लोककल्याणापेक्षा लोकरंजनाला महत्त्व दिले जाते. मात्र, शंकरराव चव्हाण यांचे राजकारण मूल्याधिष्ठित होते. त्यांनी निवडणुकांवर नजर ठेवून कोणतेच काम केले नाही. निष्काम सेवाभाव आणि रचनात्मक कार्य करीत असताना त्यांच्यात कठोर प्रशासकही दिसला. राजकीय सूड, गटबाजी, फोडाफोडी अशा कुप्रथांचा त्यांना तिटकारा होता. राजकीय मतभेद असले तरी त्यांनी मनभेद होऊ दिले नाहीत. विरोधी पक्षातील कार्यकर्त्याला, नेत्यांनाही त्यांनी स्नेहाची वागणूक दिली.दिल्लीवर ठसा उमटविला...महाराष्ट्रात त्यांच्याच काळात रोजगार हमी योजनेला गती आली. कापूस एकाधिकार योजना सुरू झाली. सचिवालयाला मंत्रालय असे नाव त्यांनीच दिले. शेतकऱ्यांचे कर्ज पहिल्यांदा माफ करणारे शंकररावजीच. राज्याप्रमाणे केंद्रात स्व. इंदिरा गांधी, राजीव गांधी, पी. व्ही. नरसिंहराव यांच्या मंत्रिमंडळातील कर्तृत्ववान मंत्री म्हणून त्यांनी दिल्लीवरही ठसा उमटविला. सदैव लोककल्याण हेच जीवित ध्येय राहिलेल्या ना.शंकरराव चव्हाण यांचे कार्य जनतेच्या सदैव ह्रदयात राहील.(४) ज्या ज्यावेळी कॅबिनेट व पक्षाच्या आमदारांच्या बैठका व्हायच्या तेव्हा त्या वेळेवर सुरू व्हाव्यात यासाठी ते चक्क दरवाजे लावून घ्यायला सांगायचे. त्यामुळे उशिरा येणाऱ्या मंत्री व आमदारांना या बैठकीत प्रवेश मिळायचा नाही. ही सवय त्यांनी सगळ्या बैठका व कामकाजातही जपली. त्यामुळे त्यांच्या बैठका वेळेवर सुरू होऊन वेळेत संपायच्या. त्यामुळे

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

त्यांची सबंध महाराष्ट्रात हेडमास्तर अशी ओळख निर्माण झाली. (५) नांदेडचे नगराध्यक्ष ते गृहमंत्रीपदापर्यंत कार्यभार यशस्वीरित्या सांभाळलेल्या डॉ. शंकरराव चव्हाण यांनी अनेक कार्य उत्तमरित्या पार पाडले. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तसेच मुख्यमंत्री, गृहमंत्रीपदापर्यंत काम केलेल्या डॉ. शंकरराव चव्हाण हे राज्यसभा, लोकसभा, विधान परिषद आणि विधानसभा अशा केंद्र व राज्यातील चारही प्रतिनिधीगृहांचे सन्माननीय सभासद राहिलेले होते. थोर स्वातंत्र्यसेनानी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली तयार झालेल्या शंकरराव चव्हाण यांनी शून्यातून विश्व निर्माण केले. राज्याच्या जडणघडणीत त्यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. कर्तव्यनिष्ठ, लोकाभिमुख, निष्कलंक चारित्र्य असलेले, दूरदृष्टी व विचार यांचा समन्वय साधणारे हे त्यांचे वैशिष्ट्ये होते.

### 5) जनतेच्या मनातील पाणीदार व्यक्तिमत्व

डॉ. शंकरराव चव्हाण यांचा 'जलसंस्कृतीचे जनक' असा गौरवपूर्ण उल्लेख होतो. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' ही त्यांची घोषणा बोधवाक्य ठरली. अनेक प्रकल्पांच्या पूर्णतेसाठी त्यांनी भगीरथ प्रयत्न केल्यामुळे त्यांचे नाव 'आधुनिक भगीरथ' म्हणून घेण्यात येते. तसेच सचिवालयाचे 'मंत्रालय' असे नामकरण शंकरराव चव्हाण यांच्या कारकिर्दित झाले. त्यांच्या कार्यकाळात महाराष्ट्राची भरीव प्रगती झाल्यामुळे जनतेच्या मनातील ते पाणीदार झाले. (६) महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद आणि केंद्रीय स्तरावर गृह व संरक्षण या खात्यांचे मंत्रिपद खंबीरपणे सांभाळून रा ज्याच्या आणि देशाच्या वाटचालीत ऐतिहासिक म्हणून नोंद झालेल्या अनेक निर्णय, प्रसंगांत मोलाची भूमिका वठवणारे शंकरराव चव्हाण यांचे आदराने नाव घेतले जाते. शिस्तप्रिय, वक्तशीर म्हणून ख्यात असलेल्या शंकररावांच्या व्यक्तिमत्त्व आणि कार्याचे स्मरण अनेक कार्यातून होते. सर्वसाधारणपणे नामवंतांच्या मुलांबाबत अनेकांना हेवा वाटतो. अशा कुटुंबात जन्माला येणे म्हणजे सहजसुलभ आयुष्य आणि कारकीर्द लाभते, असा त्यांचा समज असतो. पण हे सरसकट खरे असतेच असे नाही. किमान माझ्याबाबत तर हा अनुभव खचितच नाही. उलटपक्षी अनेकदा हा वारसा नैतिक जबाबदारी व आव्हाने वाढवणारा असतो.मी शंकरराव चव्हाण

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)



यांच्या घरी जन्माला आलो. पण ते राजकारणात होते म्हणून मी राजकारणात आलो, असे नाही. पण लहानपणापासून घरात अनुभवलेल्या वातावरणामुळे मला स्वत:ला समाजकारणात गोडी निर्माण झाली. माझा ओढा पाहून वडिलांनी मला राजकारणात येण्याची संमती दिली. त्यांना पाहून मी राजकारण शिकलो. त्यांच्याकडून शिकण्यासारखे अनेक चांगले गुण होते. 'शंकरराव चव्हाणांचा मुलगा' म्हणून मला त्यांच्या पदांचा किंवा यशाचा वारसा मिळावा, असे मला कधीही वाटले नाही; तर त्यांच्यातील असंख्य गुण आणि कर्तबगारीचा मोह मला अधिक राहिला आहे.राज्य आणि देशाच्या पातळीवर त्यांच्याकडून अनेक मोठी कामे झाली. महाराष्ट्रातील सिंचन आणि भारताची अखंडता व सार्वभौमत्व कायम ठेवण्यासाठी केंद्राच्या स्तरावर घेतलेले महत्त्वपूर्ण निर्णय, हे त्यांची सर्वात मोठी देण आहे. महाराष्ट्रातील ३१ मोठ्या धरणांपैकी निम्म्याहून अधिक धरणांच्या– उदा. भीमा नदीवरील उजनी धरण, कोकणातले काळ धरण, जायकवाडी, पैनगंगा प्रकल्प, विष्णुपुरी आदींच्या – उभारणीत त्यांचे योगदान मोलाचे होते. शेतकरी, पिण्याचे पाणी आणि उद्योग यांचा विचार केंद्रस्थानी ठेवून ही धरणे उभारली गेली. पाण्याच्या संदर्भात भविष्यातील आव्हाने त्यांनी त्याचवेळी ओळखली होती. पाण्याच्या प्रश्नाबाबत त्यांनी शास्त्रशुद्ध अभ्यास केला. आज 'महाराष्ट्राचे भगीरथ' म्हणून त्यांना ओळखले जाते आणि ही उपमाच त्यांच्या कार्याची महती सांगण्यास पुरेशी आहे.देशप्रेम त्यांच्या रोमारोमांत होते. भारताचे गृह आणि संरक्षणमंत्री असताना घेतलेल्या अनेक खंबीर निर्णयांमधून त्यांच्या निस्सीम राष्ट्रभक्तीची प्रचीती येते. दहशतवादाने ग्रासलेल्या जम्मू–काश्मीर आणि पंजाबमधील विधान–सभा निवडणुकीचे नियोजन असो, मिझोरममधील काही नेत्यांची स्वायत्ततेची मागणी फेटाळून लावणे असो, श्रीलंकेतील एलटीटीई या बंडखोर संघटनेवर घातलेली बंदी असो; देशाच्या इतिहासात नोंद झालेल्या अनेक घडामोडींमध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. देशाच्या राजकारणात इतरही असे अनेक प्रसंग आहेत, त्यांची भूमिका अतिशय खमकी होती.शेतकरी आणि श्रमिक हे त्यांच्या कार्याच्या केंद्रस्थानी होते. शेतकरी कुटुंबात जन्माला आल्याने शेतकऱ्यांच्या व्यथांची त्यांना चांगली जाणीव होती. कोरडवाहू शेतकऱ्यांची फरफट टाळण्यासाठी

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

त्यांनी आठमाही पाण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी राजकीय परिणामांची तमा न बाळगता जाहीर व स्पष्ट भूमिका घेतली. श्रमिकांप्रतिही त्यांनी कायम बांधिलकी जपली. मुख्यमंत्री असताना मुंबईतील ५२ गिरणी मालकांनी गिरण्यांच्या जमिनी विकण्यासाठी परवानगी मागितली. पण त्या वेळी गिरणी विकून मोकळे होणाऱ्या मालकांऐवजी त्यांनी तिथे काम करणाऱ्या कामगारांच्या हिताला प्राधान्य दिले. जमीन विकण्यापूर्वी गिरणी मालकांनी हजारो कामगारांच्या रोजगाराचा, भवितव्याचा काय विचार केला आहे, हा एकच प्रश्न त्यांनी ठामपणे लावून धरला. कोणाच्याही दबावासमोर ते झुकले नाहीत. तत्त्व–मूल्यांशी तडजोड केली नाही. त्यांचा निर्मोह आणि सचोटी आयुष्याच्या अखेपर्यंत ढळली नाही.शंकरराव चव्हाण यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणखी उल्लेखनीय पैलू म्हणजे ते दूरदर्शी होते, व्यासंगी होते. त्यांचे व्यवस्थापन कौशल्यही विलक्षण होते. त्यांच्या नियोजनात आणि अंमलबजावणीत कमालीची परिपूर्णता होती. प्रशासनावर त्यांचा वचक होता. ते सतत कार्यमग्न असायचे. नवे प्रकल्प, नव्या योजनांच्या अनुषंगाने अभियंते, तज्ज्ञ आणि तंत्रज्ञांचा त्यांच्याकडे सतत राबता असायचा. रोज वेगवेगळ्या घटकांतील लोकांना ते भेटायचे, त्यांच्याशी विविध विषयांवर चर्चा करायचे. त्यांचा लोकसंग्रह अफाट होता आणि माझ्या लेखी हीच त्यांची सर्वात मोठी ठेव आहे. त्यांचा मुलगा म्हणून त्यांची ही ठेव जपण्याचा माझा प्रयत्न राहिला आहे.त्यांचे वाचन, माहिती अफाट होती. विषयांची जाण होती. मराठी, हिंदी, उर्दू आणि इंग्रजी या चारही भाषांवर त्यांची चांगली पकड होती. त्यांना शेरोशायरी, तबला, शास्त्रीय संगीत आणि नाटकांचीही आवड होती. संगीत नाटकेही ते बघायचे. अध्यात्मावर त्यांचा विश्वास होता. 'शिवलीलामृत'चे ते पारायण करायचे. अतिशय खडतर आर्थिक परिस्थितीतून मार्ग काढून ते शिकले, मोठे झाले. पण वाईट काळ ते कधीही विसरले नाही. आयुष्यभर काटकसरी राहिले. अगदी मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्री असतानाही ते किती साधे राहायचे, याबाबत घरातील सदस्यांपेक्षा अन्य कोणाचाही अनुभव अधिक असू शकत नाही.ते परखड होते, वरून कठोर होते; पण त्यांच्यात एक प्रेमळ, संवेदनशील, कुटुंबवत्सल माणूसही दडला होता. अडल्यानडल्यांना ते नेहमीच मदत करायचे. दुष्काळी भागात पाणी आणल्याबद्दल आणि अडचणीच्या

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)



काळात केलेल्या मदतीमुळे अनेक जण त्यांना जणू देवच मानत. असा हा 'देवमाणूस' जनतेला लाभला हे महाराष्ट्राचे भाग्य आहे.(७) महाराष्ट्रातल्या जलसिंचनाचा वास्तवदर्शी व परिपूर्ण अभ्यास शंकरराव चव्हाण यांनी केला होता. महाराष्ट्रातील पाणीप्रश्ननाला आणि विशेषत:शेतीच्या पाणीपुरवठ्याला खंबीरपणे जी दिशा दिली ती पाहता त्यांचे महाराष्ट्राच्या जनतेवर अनंत उपकार आहेत एवढेच सांगता येईल. कारण पाण्याचे महत्व जाणून पाटबंधाऱ्याच्या क्षेत्रात जे अद्वितीय असें काम केले त्याबद्दल सदसदविवेक आणि आतला आवाज जागृत असणारा कोणताही व्यक्ति ना. शंकरराव चव्हाण साहेबांच्या" पाणीदार "कार्याला कधीच विसरणार नाही. नांदेडच्या कर्मभूमीने ना. शंकरराव चव्हाण साहेबांवर असलेले जे आलोट प्रेम सदैव राहील.(८)

संदर्भ :


१. सावंत सुरेश, जलशंकर, अभंग प्रकाशन नांदेड,१४ जुलै २०१६.
२. Sakrikar Dinkar, www.Marathivishavkosh. com.
३. Www.yashada. org
४. दर्डा राजेंद्र, शंकरराव चव्हाण : राज्याच्या जलसंस्कृतीचे जनक, लोकमत,July १४, २०२०
५. माने दयानंद,उशिरा येणाऱ्या मंत्र्यांनाही खडसावणारे 'हेडमास्तर', १४ July,२०२०.
६. अग्रोवन सकाळ,२४ January २०२०.
७. देवमाणूस,लोकसत्ता, July १२, २०२०.
८. भोंगळे सुधीर, पाणीदार, सुज्ञान प्रकाशन पुणे,१४ जुलै २०१४.


Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn) Shikshan Prasarak Sanstha's Estd. 1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

# स्पर्धा परीक्षेसाठी आमची इतर उपयुक्त पुस्तके



















Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani


## प्रितम पब्लिकेशन्स

५, वर्धमान चेंबर्स, विद्यापीठ रोड, जळगाव. मो. ९८५०२२२३५१.

♦ email - pritamjalgaon@rediffmail.com, ♦ website -www.pritampublication.com

9 788192 832548